# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### विरार-अलिबाग कॉरिडॉर मधील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१) ५५०९ (०१-०३-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार-अलिबाग कॉरिडॉर या केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रकल्प अधिकाऱ्यांकडे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

विरार-अलिबाग बहुउद्देशीय महामार्ग प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन दि.१९.०८.२०२० रोजी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतरीत झालेला आहे.

या प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या जमीनीचे भुसंपादन महाराष्ट्र महामार्ग अधिनियम १९५६ / थेट खरेदी करण्याचे प्रस्तावित असल्याने व संपूर्ण रस्त्याच्या आखणीमध्ये (Alignment) संयुक्त मोजणी पुर्ण झाली नसल्यामुळे सद्या पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धाराशीव जिल्ह्यातील तुळजापुर विकास प्राधिकरणांतर्गत नगर परिषद तुळजापुर हद्दीतील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभिकरण करण्याच्या कामास मंजुरी देण्याबाबत

**(२) ३४४९३ (०२-०२-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशीव जिल्ह्यातील तुळजापुर विकास प्राधिकरणांतर्गत नगर परिषद तुळजापुर हद्दीतील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभीकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी लेखी पत्राद्वारे दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुळजापुर विकास प्राधिकरणांतर्गत कामे करण्यासाठी शासनाकडून रुपये३१५०३.७३ लक्ष किंमतीस शासनाने संदर्भान्वये शासन मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळजापुर नगरपरिषदेने विकास प्राधिकरणांतर्गत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभीकरण करण्याचा रितसर ठराव जा.क्र.२०२१/ तु.वि.प्रा./३१५/सुप्रमा/८७५, दिनांक १ ऑगस्ट, २०२१ अन्वये पुढील मंजुरीसाठी शासनाकडे पाठविलेला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) श्री क्षेत्र तुळजापूर मंदीर, मंदीर परिसर व शहराच्या विकासास रुपये ३१५.०३७३ कोटीच्या विकास आराखड्यास शासन निर्णय दिनांक ३१.०४.२००८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे हे खरे आहे.

सदर आराखड्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभिकरण करण्याच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, तुळजापूर विकास प्राधिकरण यांनी दिनांक ०९.०८.२०२१ अन्वये शासनास सादर केला आहे हे खरे आहे.

त्यानुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक सुशोभिकरणास रुपये ८७.३१ लक्षच्या कामास शासन आदेश दिनांक २८.१२.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

---

## ठाणे महानगरपालिकेतील ३१ सदनिकांची परस्पर विक्री केल्याबाबत

**(३) ३४७४५ (११-०१-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेला दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन करीत एका विकासकाने ३१ सदनिकांची परस्पर विक्री केल्याचे माहे सप्टेंबर ,२०२१ मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परंतु अद्यापही सदरहू विकासकावर प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तातडीने सदरहू विकासकावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१), (२) व (३) अशा आशयाची बाब निदर्शनास आली असल्याची वस्तुस्थिती आहे. तथापि, ठाणे महानगरपालिकेला दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन करुन म्हाडाला हस्तांतरीत करण्याच्या सदनिकांची परस्पर अनधिकृत विक्री केल्याने महानगरपालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी विकासक व इतर यांचेविरुध्द ठाणे महानगरपालिकेमार्फत कासारवडवली पोलीस स्टेशन येथे एफ. आय. आर. क्र. ०३८० दिनांक १२.११.२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापुर ( जि. धाराशीव) नगरपरिषदेचे अनुज्ञेय असलेले यात्रा अनुदान मिळण्याबाबत

**(४) ४१०५१ (२५-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई-तुळजाभवानी मातेचे मंदिर असलेल्या तुळजापुर (जि.धाराशीव) शहरात सन २०१९, २०२० व २०२१ मध्ये नवरात्र महोत्सव, कोजागिरी पौर्णिमा यासारखे मोठे उत्सव संपन्न झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उत्सवामध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना सोयी सुविधा पुरविण्यासाठी व त्यांची गैरसोय टाळण्यासाठी यात्रा कालावधी मध्ये नगरपरिषदेकडून मोठ्या प्रमाणात कामे केली जात असून, जिल्हाधिकारी हे तुळजाभवानी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण यात्रेचे नियोजन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर यात्रेमध्ये भाविकांना सोयी-सुविधा पुरविण्याचे काम सन २०१९, २०२० व २०२१ मध्ये नगरपरिषदेमार्फत संबंधित कंत्राटदारांकडून पुरविण्यात आले असून, कंत्राटदारांना त्यासंदर्भातील देयके अदा करण्यात आली नसल्याने, सदरहू अनुज्ञेय पुरविण्यासाठी यात्रा अनुदान मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्रान्वये दिनांक ११ डिसेंबर, २०२० व २७ जानेवारी, २०२२ रोजी तसेच तत्पुर्वी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या पत्रान्वये शासनाने तुळजापूर नगरपरिषदेचे मागील तीन वर्षाचे अनुज्ञेय असलेले यात्रा अनुदान त्वरीत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :** (१), (२) व (३) सन २०१९,२०२० व सन २०२१ मध्ये नवरात्र महोत्सव, कोजागिरी पौर्णिमा यासारखे उत्सव संपन्न झाले आहेत.

शारदीय नवरात्र महोत्सव मध्ये दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी यात्रा कालावधी मध्ये नगरपरिषदेकडून मोठ्या प्रमाणात कामे केली आहेत.

मा. जिल्हाधिकारी हे तुळजाभवानी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष असुन त्यांच्या नियोजनाखाली संपुर्ण यात्रेचे नियोजन केले जात असल्याचे मुख्याधिकारी, तुळजापूर यांनी त्यांच्या दिनांक २६.०५.२०२२ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे.
(४) सन २०१९-२० करीता शासन निर्णय दिनांक २६ मार्च, २०२० अन्वये रुपये २,८५,७१,४२९/-, सन २०२०-२१ करीता शासन निर्णय दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० अन्वये रुपये ३,०३,५७१/- सन २०२१-२२ करीता रुपये २,५०,२५,००००/- व शासन निर्णय दिनांक २४ मार्च, २०२२ अन्वये रुपये ३१,००,०००/- इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्रातील नगरपरिषदाना सहाय्यक अनुदान न मिळाल्याबाबत

**(५) ४३३४४ (२७-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००६ पासून महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे जकात कर बंद करून त्याची प्रतिपूर्ती सहाय्यक अनुदानामार्फत केली जाते तसेच सहाय्यक अनुदानावर दरवर्षी दहा टक्के वाढ देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेली काही वर्ष नगरपालिकांना सदर अनुदान प्राप्त झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०५-२०२३) :** (१) सन २००६ पासून महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे जकात कर बंद करण्यात आल्याने त्यांची मागणी व त्यानुसार प्राप्त निधीनुसार सहाय्यक अनुदानाद्वारे नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्रतिपुर्ती केली जाते. शासनाच्या वार्षिक अंदाजपत्रकाच्या तरतूदींनुसार राज्यातील नगरपरिषदांना त्यांची वार्षिक मागणी निश्चित करुन व त्यात दरवर्षी १० टक्के वाढ करुन सहाय्यक अनुदान वितरित करण्यात येत आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सामाजिक न्यायाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रीमंडळाची उप समिती स्थापन करण्याबाबत**

**(६) ४४६०६ (२०-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी सामाजिक न्यायाच्या योजना राबविण्याबाबत दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी शासनास पत्र पाठविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुषंगाने सामाजिक न्यायाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी एक मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करावी, अशी मागणी ऊर्जामंत्री यांनी दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी सामाजिक न्यायाच्या योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) : (१)** होय हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) उपरोक्त निवेदने या विभागास प्राप्त झाल्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी महिला अभियंत्याना अपमानास्पद वागणूक देत असून त्यांनी केलेल्या नियमबाह्य कारभाराची चौकशी करण्याबाबत**

**(७) ४५४२१ (३०-१०-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषद कार्यालयातील श्रीमती श्रद्धा संजय मोटे यांची दिनांक ३० जानेवारी, २०१९ पासून ‘उपनगर अभियंता (बांधकाम विभाग)’ या पदावर नियुक्ती झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या रुजू झाल्यापासून त्यांना महिला म्हणून नेहमी दुय्यम दर्जाची वागणूक देण्यात आलेली असून, नेहमी त्यांच्या कार्यक्षमतेवर अविश्वास दाखवण्यात आला आहे. नगरपरिषद अंबाजोगाई येथे महिलांना त्यांचा पदभार देण्यात येत नाही. मागील साडेतीन वर्षापासून फक्त कागदोपत्री पदभार देऊन प्रत्यक्ष बांधकाम विभागातील ९९ टक्के कामे त्यांच्या परस्पर करण्यात आली आहेत. यासंदर्भात त्यांनी कोठेही तक्रार करू नये यासाठी वेळोवेळी त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही महिन्यापूर्वी त्यांच्याकडे शिवभोजन थाळी योजनेचा दैनंदिन अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असता, त्या एका स्वाक्षरीकरीता मुख्याधिकारी, श्री.अशोक साबळे यांनी त्यांना दोन तास त्यांच्या कार्यालयात बसवून ठेवले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी एक महिला म्हणून मुख्याधिकाऱ्यांची वागणूक अयोग्य असून, यासह विविध प्रकारे मुख्याधिकारी त्रास देत असल्याबाबत तसेच नगरपालिकेतील दैनंदिन नियमबाह्य कारभाराबाबत मुख्याधिकारी यांना निलंबित करण्याची मागणी नगरपरिषद सदस्यासह श्रीमती श्रद्धा संजय मोटे यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना कळविले आहे व त्यानुषंगाने वरील प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २८ मे, २०२२ व दिनांक ०९ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करून संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत दि.०४.०५.२०२२ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली आहे.
(४) हे अंशतः खरे आहे,
याबाबत दि. २८.०५.२०२२ रोजीची तक्रार नगरपरिषद प्रशासन संचालनालयास तसेच दि.३०.०५.२०२२ रोजीची तक्रार विभागास प्राप्त झाली आहे.
(५) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालानुसार, श्रीमती श्रद्धा संजय मोटे, स्थापत्य अभियंता (श्रेणी-ब), अंबाजोगाई नगरपरिषद या महिला कर्मचारी असल्याने, त्यांना दुय्यम प्रकाराची अथवा अन्यायकारक वागणूक देऊन किंवा महिला असल्याचा गैरफायदा घेण्याच्या उद्देशाने श्री.साबळे, मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद यांनी वर्तन केल्याचे उपलब्ध कागदपत्रे व जबाब यावरुन स्पष्ट होत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील राष्ट्रीय बाजार दिवे येथे सुरु करण्याबाबत

**(८) ४७३३७ (०६-१०-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील प्रस्तावित असलेला राष्ट्रीय बाजार दिवे ऐवजी हवेली तालुक्यातील साष्टे या गावी आरक्षित करण्यात आलेल्या ५३ एकर जागेवर उभारण्यात येत असल्याचे दिनांक २९ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये असंतोषाची तीव्र भावना निर्माण झाल्याचे आढळुन आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय बाजार दिवे येथे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीने दि. १८.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील रिंगरोड लगत एकाच ठिकाणी सुमारे ४०० ते ५०० एकर जागा बाजार समिती, पुणेस मिळणेबाबत
तसेच दि.०४.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे उक्त प्रस्ताव सादर केला आहे.त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसिलदार, पुरंदर यांचेकडून सदर जागेचा मोजणी नकाशा, गट नकाशाचा पंचनामा, सदर गटाचे पंचनामे, सदर गटाचे फेरफार उतारे बाबत माहिती मागविणेत आली आहे.
तसेच पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण व जिल्हा परिषद पुणे यांचेकडे जागा मागणी संदर्भातील अभिप्राय व दिवे ग्रामपंचायत यांच्या ग्रामसभेचा ठराव इ. बाबत माहिती मागविणेत आली होती. त्यानुसार या पैकी तहसिलदार, पुरंदर यांचेकडून मोजणी नकाशा, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण व जिल्हा परिषद यांचे अभिप्राय, दिवे ग्रामपंचायतीचा ठराव इ. प्राप्त नाहीत. या बाबी व्यतिरिक्त इतर मुद्यांची पुर्तता झाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील रहिवासी इमारती, रिसोर्ट व तारांकित हॉटेल्सना मालमत्ता कर लावण्याबाबत

**(९) ४७६५६ (२५-०९-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि. नाशिक) हे पर्यटन स्थळ असून सदर शहराचे औद्योगिकीकरण झाले असल्याने तसेच त्र्यंबकेश्वर हे बारा ज्योर्तिलिंगापैकी एक ज्योर्तिलिंग असल्याने येथे देशभरातून लाखो पर्यटक येत असल्याने नविन रहिवासी इमारती, रिसोर्ट, तारांकित हॉटेल्स स्थापित झाली असून अद्यापही यांना मालमत्ता कर लावण्यात आलेला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाच्या महसूलात मोठया प्रमाणात तूट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या रहिवासी इमारती, रिसोर्ट व तारांकित हॉटेल्स यांना तातडीने मालमत्ता कर लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

इगतपुरी नगरपरिषद हद्दीत वसुली लिपिकामार्फत दरवर्षी सर्वेक्षण करुन नवीन बांधकामांना नियमानुसार कर आकारणी करण्यात येते. तसेच दर चतुर्थ वार्षिक फेरमुल्यांकन वर्षामध्ये संपुर्ण नगरपरिषद हद्दीतील जुन्या मालमत्ता व नविन बांधकामे यांचे सर्वेक्षण करुन नियमानुसार कर आकारणी करण्यात येते.

त्रिंबक नगरपरिषद हद्दीतील सर्व रहिवासी इमारत, रिसॉर्ट, तारांकित हॉटेल्स व खुल्या जमिनी यांना घरपट्टी लावण्यात आलेली असून, सन २०२२-२३ दरम्यान चतुर्थ वार्षिक फेरमुल्यांकन देखील करण्यात आलेले आहे. तसेच कर आकारणीस पात्र असणाऱ्या सर्व मालमत्तांना भांडवली मुल्यावर आधारित आकारणी करण्यात आलेली असून, मालमत्ता कराची वसूली करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

नगरपरिषद हद्दीतील कर आकारणीस पात्र असलेल्या सर्व मालमत्तांना अधिनियमातील तरतूदीनुसार कर आकारणी करुन नगरपरिषदेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) नगरपरिषद हद्दीत वसुली लिपिकामार्फत दरवर्षी सर्वेक्षण करुन, पात्र मालमत्तांना नियमानुसार कर आकारणी करण्यात येते. त्यानुसार मालमत्ता कराची वसूली करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि. जळगांव ) येथे कोल्हापूर बंधारा पध्दती सारखे प्रकल्प राबविण्याबाबत

**(१०) ४७६८५ (१५-११-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील बोदवड तालुका हा कायम दुष्काळी तालुका असून उन्हाळयात शेती तसेच पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर होत असल्याने सदर दुष्काळी परिसराचा विकास करण्याकरिता विशेष बाब म्हणून भूजल संधारणासाठी कोल्हापूर बंधारा पध्दती सारखे प्रकल्प राबविण्याकरिता शासनाने निधीची तरतूद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित विभागाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरहू शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मा. लोकप्रतिनिधींनी मागणीच्या अनुषंगाने मुक्ताईनगर मतदार संघातील बोदवड तालुक्यातील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत असलेल्या निधी तरतुदीतून एकूण ६ गेटेड सिमेंट बंधारे योजनांच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर नगरपरिषदेला (जि.बुलढाणा) वेतन देयकासाठी मिळणारे सहाय्यक अनुदान वाढवून मिळणेबाबत**

**(११) ४७७७० (२८-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर नगरपरिषद (जि.बुलढाणा) करीता नगरपरिषद प्रशासन संचालनालयातर्फे दरमहा मिळणारे सहाय्यक अनुदान हे दरमहा आवश्यक निधीच्या तुलनेत कमी असून, ७ व्या वेतन आयोगानुसार सर्व कर्मचारी व निवृत्तीवेतनधारक यांचे दरमहा वेतनाची देयके वाढली आहेत, त्या अनुषंगाने नगरपरिषद, मलकापूर करिता देण्यात येणाऱ्या सहाय्यक अनुदानामध्ये वाढ करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांना दिनांक २३ मे, २०२२ रोजी त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०५-२०२३) :** (१) होय.
(२) मलकापूर नगरपरिषदेच्या मागणीप्रमाणे दिनांक ०४.०५.२०२२ व दिनांक १४.०६.२०२२ अन्वये एकुण ५.२८ कोटी इतके अनुदान नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत वितरित करण्यात आले आहे. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने सादर केलेल्या वाढीव अनुदानाच्या मागणीनुसार वित्त विभागास पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. वित्त विभागाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर संबंधीत नगरपरिषदांना अनुदान उपलब्ध करुन देण्याकरिता नगरपरिषद प्रशासन संचालनालयास वितरित करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महापालिकेच्या वैकुंठ स्मशानभूमीत ३५ लाख रुपयांचे स्क्रबर बसविण्याबाबत**

**(१२) ४८०६३ (२८-०९-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या वैकुंठ स्मशानभूमीत पार्थिव दहनानंतर हवेमध्ये मिसळणारे जड कण कमी करण्यासाठी ३५ लाख रुपयांचे स्क्रबर बसविण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाने स्क्रबर बसविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०५-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) वैकुंठ स्मशानभूमी येथील प्रदुषण कमी करण्यासाठी तेथे अस्तित्वात असलेल्या सर्व यंत्रणेची तपासणी मे.नीरी (National Environmental Engineering Research Institute) नागपूर या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत करुन घेण्यात आली आहे.

(३) वैकुंठ स्मशानभूमी येथे स्क्रबर बसविण्याचे काम चालू असून एप्रिल-२०२३ अखेर सदर काम पूर्ण होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील गुंठेवारीला मुदतवाढ देण्याबाबत**

**(१३) ४८६४९ (०१-११-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील गुंठेवारी करण्याची मुदत दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास संपली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे अनेक लाभार्थी गुंठेवारीपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे उक्त लाभार्थ्यांना अधिकची संधी मिळावी यासाठी गुंठेवारी करण्यासाठी ६ महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) नांदेड जिल्ह्यात गुंठेवारी कायद्याची अंमलबजावणी दि.१५.०२.२०२२ पासून सुरु करण्यात येवून दि.३०.०६.२०२२ पर्यंत प्रस्ताव स्वीकारण्यात आले असून सदर प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत प्रथमत: दि.३१.१०.२०२२ व तदनंतर दि.३१.०३.२०२३ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

---

**ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा परिसरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी कळवा खाडीवर उभारण्यात आलेला नवीन तिसरा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत**

**(१४) ४९८६४ (२०-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील(आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल),श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी कळवा खाडीवर उभारण्यात आलेला नवीन तिसरा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय तसेच आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे दिनांक २३ जुलै, २०२२ व २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा तत्पूर्वी देखील वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार परिसरातील वाहतुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला कळवा खाडीवरील नवीन पूल वाहतुकीकरीता खुला करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर कळवा खाडीवरील नवीन तिसऱ्या पूलाची पोलीस आयुक्त कार्यालय ते कळवा चौक तसेच बेलापूर रोड कडील अशा तीन मार्गिका दिनांक १३.११.२०२२ रोजी वाहतुकीसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे.
तसेच दिनांक ३०.११.२०२२ रोजी जेल बाजूकडील चौथी मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. अशा प्रकारे एकूण पूलाच्या क्षेत्राचा साधारणत: ८०% भाग वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. त्यामुळे या ठिकाणी

होणारी वाहतुक कोंडीची समस्या कमी झालेली आहे. तसेच सदर पूलाची उर्वरित साकेत रस्त्याकडील मार्गिका माहे मार्च, २०२३ पर्यंत वाहतुकीसाठी खुली करण्याचे नियोजन असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील तलावांची झालेली दुरवस्था**

**(१५) ४९८६७ (२०-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विशेषतः कळवा, मुंब्रा, वागळे इस्टेट, घोडबंदर रोड येथील तलावांची प्रचंड दुरवस्था झालेली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच परिसरातील तलावांच्या दुरुस्ती, पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील तलावांच्या दुरवस्थेच्या अनुषंगाने समाज माध्यमात तक्रारी निदर्शनास आल्या असल्याची वस्तुस्थिती आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध तलावांचे संवर्धन व सुशोभिकरण महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील २६ तलावांच्या जतन, सवंर्धन व सुशोभिकरण करण्यास शासनाकडून दिनांक ०४.०७.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार शहर क्षेत्रातील तलावांचे आवश्यकतेनुसार निगा व देखभाल करण्यात येते तसेच शासन निधीतून देखील काही तलावांची कामे मंजुर झाली आहेत. या व्यतिरिक्त केंद्र शासनाच्या अमृत २ अभियांना अंतर्गत १५ तलावांच्या संवर्धनाची कामे फेब्रुवारी, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्याबाबत**

**(१६) ४९८७० (१७-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यासाठी राज्यातील ५६ मुस्लीमबहुल शहरातील सर्वेक्षणाचे काम टाटा समाज विज्ञान या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातुन करण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आर्थिकदृष्ट्या अडचणींत असलेल्या मुस्लीम समाजाच्या समस्या सोडविण्याबाबत तसेच त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्यातील अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यासाठी राज्यातील ५६ मुस्लीमबहुल शहरातील सर्वेक्षणाचे काम टाटा समाज विज्ञान या शैक्षणिक संस्थेची निवड करण्याबाबत दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत शासन विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद अंतर्गत येवला तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांवरुन स्थगिती उठविण्याबाबत**

**(१७) ४९९९६ (२०-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद अंतर्गत येवला तालुक्यातील जलसंधारणाच्या ३३ कामांना शासनस्तरावरून देण्यात आलेली स्थगिती उठविण्यात येवून ही कामे तात्काळ सुरु करण्याबाबत माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जलसंधारणाच्या कामांची स्थगिती उठवून कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दि.२४.०२.२०२२ पर्यंत रु. ४०५७.७८ कोटी किंमतीच्या २५.४५ योजनांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे. तथापि, सद्यस्थितीत येवला तालुक्यातील ३३ योजना स्थगितीमध्ये आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माणगाव मोर्बा (ता.माणगाव, जि.रायगड) येथील रस्त्यावर कचरा साचल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरल्याबाबत**

**(१८) ५०१०९ (२०-०१-२०२३). कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माणगाव मोर्बा (ता.माणगाव, जि.रायगड) येथील गांधी राईस मिलच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा साचल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यावर कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरल्याने नागरिक, प्रवासी, पर्यटक यांना त्रास होत असून परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर देखील परिणाम होत असतांनाही नगरपंचायतीचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने माणगाव नगरपालिकेने स्वच्छतेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०२३) :** (१) माणगाव मोर्बा (ता.माणगाव, जि.रायगड) येथील गांधी राईस मिलच्या रस्त्यालगत लोकवस्तीच्या बाहेर खुली जागा असल्याने काही प्रमाणात कचऱ्याचे ढिग आढळून आले, ही वस्तूस्थिती आहे.
(२) हे खरे नाही.

(३) माणगांव नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये नियमितपणे साफसफाई करण्यात येत असून IEC अंतर्गत नागरीकांमध्ये उघडयावर कचरा टाकू नये याबाबत जनजागृती करण्यात येते. शहरामध्ये ठिकठिकाणी घंटागाडयामार्फत कचरा संकलित करण्यात येतो. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरीकांविरुध्द नगरपंचायत प्रशासनाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येत असून त्यामुळे नागरीकांकडून रस्त्यावर कचरा टाकण्यास आळा बसलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मुस्लीम समाजाला (विशेष मागास प्रवर्ग-अ) नोकरी व शैक्षणिक संस्थामध्ये आरक्षण मिळण्याबाबत**

**(१९) ५०१४१ (१७-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुस्लीम समाजाला (विशेष मागास प्रवर्ग-अ) नोकरी व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुस्लीम समाजाला योग्य आरक्षण (विशेष मागास प्रवर्ग-अ) देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०९.०७.२०१४ रोजीच्या अध्यादेशानुसार मुस्लिम (विशेष मागासप्रवर्ग) समाजासाठी नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. यामध्ये मुस्लिम धर्मातील एकूण ५० मागास घटकांना आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय राहणार होता. तथापि, याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४.११.२०१४ रोजी या प्रकरणी अंतरिम निर्णय दिला आहे. सदर अंतरिम आदेशाद्वारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आलेले आहे. परंतु खाजगी विनाअनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३.१२.२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने अध्यादेश व्यपगत झाला आहे. तथापि, दिनांक ०९.०७.२०१४ ते दिनांक २३.१२.२०१४ या काळातील शासकीय तसेच अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश अबाधित ठेवण्यात आलेले आहेत. तसेच दिनांक ०९.०७.२०१४ ते दिनांक १४.११.२०१४ या दरम्यानच्या काळातील शासकीय सेवेत झालेल्या नियुक्त्या अबाधित राहणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बार्टीच्या समता प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(२०) ५०४१९ (१८-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण (बार्टी) संस्थेअंतर्गत समता प्रतिष्ठानमार्फत राबविलेल्या उपक्रमांमध्ये अंदाजे १४ कोटींचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासंदर्भातील आर्थिक गैरव्यवहाराची विशेष तपास पथकामार्फत (SIT) जलदगतीने चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल विधीमंडळ सभागृहासमोर ठेवण्यात येईल असे तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री यांनी घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही उक्त प्रकरणाबाबतचा अहवाल सभागृहात सादर करण्यात आला नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२३) :** (१), (२) ३) व (४) बार्टीच्या समता प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. बार्टीच्या समता प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबतच्या अहवालाची स्वाक्षरीत प्रत अद्याप शासनास प्राप्त झालेली नाही.

बार्टीच्या समता प्रतिष्ठानमार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमामध्ये झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### संजय गांधी निराधार योजनेंतर्गत उत्पन्नाच्या अटींबाबत

**(२१) ५११५५ (१८-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६५ वय वर्षे पूर्ण झालेल्या वृध्दांना आर्थिक मदत देणेसाठी त्यांच्या आर्थिक विवंचनेमुळे वृध्द लोकांना समाजात बरोबरीची तसेच त्यांच्या कुटूंबियांकडून वाईट प्रकारची वागणूक मिळते या सर्व गोष्टी लक्षात घेऊन 'वृध्दावस्थ' पेन्शन योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रावणबाळ योजनेंतर्गत 'अ' आणि 'ब' या दोन श्रेणी असून त्यांची नावे बीपीएल (दारिद्रय रेषेखालील) यादीमध्ये असून एकूण ९३ हजार ९३४ लाभार्थी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे संजय गांधी योजनेमध्ये विधवा परितक्ता, घटस्फोटीत, दुर्धर आजार, निराधार महिला यांना लाभ देण्यासाठी लाभार्थ्यांना उत्पन्नांचा दाखला सादर करण्यास सांगितले जात असून सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये २१ हजार रुपये वार्षिक उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उत्पन्नाचा दाखला देताना महिना अडीच ते तीन हजार रुपयांचे उत्पन्न गृहीत धरले जात असल्यामुळे तहसिल कार्यालयाकडून २१ हजार रुपयांचा दाखला मिळत नसल्यामुळे लाभार्थी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, श्रावणबाळ व संजय गांधी योजनेसाठी २१ हजार रुपयांचा दाखला देण्यासाठी येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन उत्पन्न मर्यादा वाढवणे आवश्यक असल्याने त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०४-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) विशेष सहाय्य योजनांसाठी लाभार्थ्यांकरिता असलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

---

### राज्यातील अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांबाबत

**(२२) ५१४६३ (१८-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध विभागात तसेच अन्य प्राधिकरणात अनुसूचित जमातीसाठी असलेल्या राखीव जागांवर नियुक्त

झाल्यानंतर जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेल्या १२ हजार ५०० कर्मचाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयानुसार सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना तत्कालीन शासनाने दिनांक २१ डिसेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये सर्व कर्मचाऱ्यांना ११ महिन्यांच्या तात्पुरत्या सेवेवर (अधिसंख्य) वर्ग केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात कर्मचाऱ्यांची स्थिती अधांतरी झाली होऊन उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून ते सातत्याने आंदोलने करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन या कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी मा.न्यायालयाचा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०२३) :** (१) अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या नसून त्यांच्या सेवा नियमित पदावरुन अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून फेब्रुवारी, २०२३ अखेर प्राप्त झालेल्या माहितीनुसार एकूण ६८६० अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना मानवतावादी दृष्टीकोनातून व त्यांनी केलेल्या सेवेचा विचार करुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुन्हा ११ महिन्याच्या कालावधीकरीता त्यांच्या सेवा सेवानिृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरु ठेवण्याचे तसेच त्यांना सेवाविषयक (पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून) व सेवानिवृत्तीविषयक लाभ देण्याचे आदेश दि.१४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उर्दू व कन्नड शाळेतील मानसेवी शिक्षकांना अत्यल्प मासिक वेतन मिळत असल्याबाबत**

**(२३) ५१५३५ (१७-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इयत्ता आठवी, नववी व दहावी साठी उर्दू व कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाच्या योजनेंतर्गत ९३३ शिक्षक अनेक वर्षे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मानसेवी शिक्षकांना ५००० रुपये इतके अत्यल्प मासिक वेतन मिळत असल्याने त्यांना कायम करून किमान वेतनमान तसेच माध्यमिक शिक्षकांचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्यातील इयत्ता आठवी, नववी व दहावी साठी उर्दू व कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्यासाठी अल्पसंख्याक आयोगाच्या योजनेंतर्गत अमराठी शाळेत इयत्ता आठवी, नववी व दहावी मध्ये शिकणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्याकरीता दि.२७.४.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नऊ महिन्यांकरीता शिक्षकांची मानसेवी तत्त्वावर नेमणूक केली जाते. सद्यस्थितीत या योजनेंतर्गत ४७६ मानसेवी शिक्षक कार्यरत आहेत.
(२) मराठी भाषा फाउंडेशन योजनेंतर्गत नियुक्त मानसेवी शिक्षकांना इयत्ता ८ वी ते १० वीच्या अमराठी माध्यमाच्या (उर्दू, कन्नड, इ.)शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेनंतर मराठी भाषा शिकविण्याकरीता अतिरिक्त शिकवणी करण्यात येते.
त्यासाठी त्यांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येते. शासन निर्णय दि.२७/०४/२०१५ अन्वये सदर मानसेवी शिक्षकांना शाळेच्या वेळेनंतर अतिरिक्त शिकवणी करणे अपेक्षित असल्याने त्याकरीता रु.५००० दरमहा

मानधन देण्यात येते. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येते. त्यामुळे सदर शिक्षकांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील बीआरटी मार्ग बंद करण्याबाबत**

**(२४) ५१५४७ (२२-०१-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बीआरटी मार्गामुळे वाहतूक कोंडीत अधिक भर पडत असल्याने, सदरहू बीआरटी मार्ग बंद करण्याची मागणी पोलिसांनी महानगरपालिकेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०५-२०२३) :** (१) होय.

(२) पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील एकूण रस्त्याच्या विचार केला तर सुमारे २० किलोमीटर लांबीची बीआरटी मार्ग आहे. सदरचे प्रमाण शहरातील एकुण रस्त्याचा विचार करता हे योग्य आहे. पुण्यातील बीआरटी नसलेल्या इतर मुख्य रस्त्यापैकी बाजीराव रोड, सेनापती बापट रोड, लॉ कॉलेज रोड, युनिव्हर्सिटी रोड इत्यादी मुख्य रस्त्यांवर वाढत्या खाजगी वाहन संख्येमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या सर्व बाबी विचारात घेता बी.आर.टी. च रस्त्याचे रहदारीस व वाहतुकीच्या कोंडीस कारणीभूत आहे असे म्हणणे योग्य होणार नाही.

पुण्यातील रस्त्याच्या रुंदी व वाढती वाहनांची संख्या हे प्रमाण व्यस्त आहे. आदर्श वाहतूकी करिता रस्त्याची रुंदी व त्यावरील वाहणा-या कमाल वाहनांची संख्या ८०% पर्यत असणे आवश्यक आहे. पुण्यातील रस्त्या वरील वाहन संख्या ही आदर्श कमाल वाहन संख्या म्हणजे ८० टक्के पेक्षा अधिक म्हणजे १२०% इतकी झाली आहे. तसेच रस्त्यावर खाजगी मोटारींची संख्या मोठ्या प्रमाणात असून प्रत्येक मोटारीतून एक ते दोन व्यक्तीच प्रवास करतात तसेच रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात पार्किंग करण्यात येते. हा घटकसुध्दा वाहतुकीच्या कोंडी साठी कारणीभूत आहे.

पुणे शहरातील सार्वजनिक वाहतुकीचे सक्षमीकरण झाल्याशिवाय रहदारी वरील खाजगी वाहनांची संख्या/ प्रमाण कमी होणार नाही, ही बाब नाकारता येणार नाही. उपरोक्त सर्व मुद्द्यांचा साधक बाधक विचार करता पुणे शहरात अस्तित्वातील बीआरटी मार्ग काढणे अथवा बंद करणेबाबत बीआरटी मार्गाशी संबंधित पुणे महामेट्रो पीएमपीएमएल, पुणे शहर वाहतुक विभाग इत्यादी विभागाची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येत आहे. सदर बैठकीमध्ये सर्व विभागाशी संबंधित बाबीच्या अनुषंगाने चर्चा करुन बैठकीतील होणा-या निर्णयानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**गडचिरोली येथील समाज कल्याण विभागातील सहाय्यक आयुक्तांचे पद भरण्याबाबत**

**(२५) ५१६६४ (१८-०१-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील समाज कल्याण विभागातील सहाय्यक आयुक्तांचे पद रिक्त असल्याने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, चंद्रपुर यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली येथील रिक्त असलेले सहाय्यक आयुक्त पद भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण व तत्सम, गट-अ संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पात्र उमेदवारांची शिफारस करण्यात आल्यानंतर महसूली विभाग वाटप नियमावलीनुसार शिफारसपात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या समजाकल्याण विभागामार्फत अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी मदत मिळावी या उद्देशाने बीज भांडवल योजना राबविण्याबाबत

**(२६) ५१७८९ (१८-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागामार्फत अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी मदत मिळावी या उद्देशाने बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) अमरावती जिल्ह्यातील अपंग बांधवांनी बीज भांडवल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडे अर्ज केले असून समाजकल्याण विभागाने संबंधित अर्ज मंजुरीसाठी पाठविले असता कर्ज मंजूरीस दिरंगाई होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अपंगांना कर्ज मंजूर करण्याबाबत निदेश दिल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना कर्ज देताना राष्ट्रीयकृत बँका दुर्लक्ष करत असून राज्य शासनामार्फत पाठविण्यात येणाऱ्या एकूण प्रकरणांच्या केवळ २५% प्रकरणांनाच बँकेकडून मंजुरी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना तात्काळ कर्ज मिळावे या दृष्टीने राष्ट्रीकृत बँकाशी समन्वय साधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (११-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) बँक अधिकारी आणि लाभार्थी यांची दि.१८ ऑक्टोबर, २०२२ रोजी बैठक घेऊन अर्जातील त्रुटीची पुर्तता करणेबाबत लाभार्थी आणि बँक अधिकारी यांचेमध्ये समन्वय साधून अर्ज निकाली काढण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिका येथील शासकीय कर्मचारी वसाहतीच्या इमारतीच्या दुरुस्तीकरीता निधी मंजूर करण्याबाबत

**(२७) ५१८५९ (२०-०१-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेतील शासकीय कर्मचारी वसाहत इमारत निष्कासित करून नव्याने शासकीय कर्मचारी वसाहत इमारत बांधकासाठी निधी मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व महापौर, भिवंडी महानगरपालिका यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) व (२) सदर आशयाची मागणी करण्यात आल्याची वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर कामासाठी शासन निधी मिळणेसाठी अंदाजपत्रक तयार करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची बाब भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महानगरपालिकेत प्रभाग अधिकाऱ्याची चौकशी न करता सेवेत रुजू केल्याबाबत**

**(२८) ५१९३७ (२७-०१-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महानगरपालिकेत बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यात प्रभाग अधिकाऱ्याने दिरंगाई केल्यामुळे दोषारोप बजावून मा.आयुक्तांनी संबंधीत अधिकाऱ्याला निलंबित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अवघ्या १३ दिवसांनी या प्रभाग अधिकाऱ्याची कोणतीही चौकशी न लावता पुन्हा सेवेत रुजू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रशासन व शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१), (२), (३) व (४) भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती ५ मधील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाबाबत दुर्लक्ष केल्यामुळे प्रभाग अधिकाऱ्यास दिनांक २३.०९.२०२२ रोजी निलंबित केले होते.

तसेच, संबंधित प्रभाग अधिकाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ चे नियम ८ अन्वये करावयाच्या विभागीय चौकशीच्या निर्णयाच्या अधीन राहून दिनांक ०७.१०.२०२२ रोजी सेवेत पुनर्स्थापित केले असल्याची वस्तुस्थिती आहे.

तथापि, सबंधित प्रभाग अधिकाऱ्यास विभागीय चौकशीसाठी दिनांक ११.११.२०२२ रोजी ज्ञापन बजावले आहे. उपरोक्त वस्तुस्थिती भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, सदर प्रकरणी अनधिकृत बांधकामाविषयक शासन स्तरावर निर्गमित दिनाक ०२.०३.२००९ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार तात्काळ आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

---

**पुणे जिल्ह्यातील आरटीओ क्षेत्रात परवाना नुतनीकरणासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांऐवजी दलाल वैद्यकीय प्रमाणपत्र देत असल्याबाबत**

**(२९) ५२१४९ (१९-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील आरटीओ क्षेत्रात परवाना नुतनीकरणासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांऐवजी दलाल ५० रुपयांत विना तपासणी वैद्यकीय प्रमाणपत्र देत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नोंदणी आरटीओ कार्यालयात असणे आवश्यक असतानाही दलाल व आरटीओ कार्यालयातील अधिकारी यांच्या संगनमताने बनावट वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे परवाना नुतनीकरण करीत असल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने वैद्यकीय प्रमाणपत्र नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून घेण्याबाबत व बोगस वैद्यकीय प्रमाणपत्र देणाऱ्या दलाल तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०२३) :** (१) व (२) नाही.
(३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे कार्यालयामार्फत एकूण ३६ एमबीबीएस तसेच त्यावरील पात्रतेच्या डॉक्टरांना ऑनलाईन वैद्यकीय प्रमाणपत्र अपलोड करण्यासाठी व ऑफलाईन पध्दतीने वैद्यकीय प्रमाणपत्र कार्यालयात सादर करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. विहित वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय परवाना नुतनीकरणाच्या अर्जास मान्यता देण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील दिव्यांगाच्या शाळांमधील शिक्षकांसह कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(३०) ५२४०७ (१८-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील दिव्यांगाच्या ५७ अनुदानीत शाळांपैकी १७ शाळांमधील शिक्षकांसह कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित रहावे लागल्याची बाब दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी वेतनापेटी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने दिव्यांग कल्याण आयुक्तांकडे सुमारे सव्वादोन कोटी रुपयांची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निधीची तरतूद करुन सदर प्रलंबित वेतन तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०४-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र क्र. ३६३३, दि.२९.०८.२०२२ रोजी वेतनाकरिता तरतूदीची मागणी करण्यात आलेली होती. त्यानुसार आयुक्त,दिव्यांग कल्याण यांचे आदेश क्र.२०६९, दि. १४.०९.२०२२ अन्वये तरतूद वितरीत करण्यात येऊन त्यानुसार उर्वरित १७ शाळांचे माहे, ऑगस्ट २०२२ चे वेतन सप्टेंबर २०२२ मध्ये अदा करण्यात आले. तसेच माहे ऑक्टोंबर, २०२२ पर्यंत पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांचे वेतन अदा करण्यात आलेले आहे असे जिल्हा परिषद पुणे यांचेकडून कळविण्यात आलेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
प्रवर्गनिहाय शाळांचे वेतनाकरिता आयुक्त,दिव्यांग कल्याण पुणे यांचेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे यांचेकडून मागणी करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने पुणे जिल्हा परिषदेस आवश्यक ती तरतूद वितरीत करण्यात आली आहे.
(३) सद्यस्थितीत पुणे जिल्ह्यातील दिव्यांगांच्या अनुदानित सर्व शाळांचे माहे जानेवारी, २०२३ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत ॲप आधारित खाजगी कॅब चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमावली करण्याची आवश्यकता असल्याबाबत

**(३१) ५२५०६ (२२-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुरक्षित प्रवास व चांगली सेवा मिळेल या विश्वासाने अनेक प्रवासी विशेषतः महिला प्रवासी ॲप आधारित खाजगी कॅब बुक करत असून प्रवाशांच्या सुरक्षेची हमी, सेवाचा दर्जा आणि चालकाचे वर्तन आदींबाबतची हमी देत नसल्याचे उबर या ॲप आधारित कंपनीने आपल्या कंत्राटात नमुद केल्याचे मुंबई ग्राहक तक्रार मंचाकडे सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रात दिले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्राहकांकडून कंपनीच्या खात्यात पैसे जमा होतात तसेच कंपनीच्या धोरणाचा भंग करणाऱ्या वाहनचालकावर कारवाई करण्याची तरतूद उबरने केली असूनही ग्राहक मंचाची दिशाभूल करित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई सारख्या शहरात अप आधारित टॅक्सी चालकांकडून प्रवाशांची विशेषतः महिला प्रवाशांबाबत गैरवर्तणूकीच्या घटना मोठया प्रमाणात घडत असून ॲप आधारित कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमावली नसल्यामुळे ग्राहकांना न्याय मिळविण्यासाठी खुपच अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुंबईत ॲप आधारित खाजगी कॅब चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने नियमावली तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२३) :** (१) व (२) मुंबई येथील ग्राहक मंचाकडे नव्हे तर ठाणे येथिल अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवरण मंच, नवी मुंबई यांचेकडे श्रीमती कविता शर्मा विरुध्द उबेर इंडिया सिस्टम्स प्रा.लि. ग्राहक तक्रार क्रमांक ६१/२०२१ मध्ये मा.ग्राहक मंचाने दिनांक २५.०८.२०२२ रोजीच्या अंतिम आदेशानुसार ग्राहकास दोषपूर्ण सेवा दिली असल्याबाबत निष्कर्ष नोंदविला असून त्यापोटी प्रतिवादी यांना नुकसान भरपाई व खर्चापोटी रु.२०,०००/- इतका दंड मे. उबर कंपनी यांच्यावर ठोठावला आहे. या संदर्भातील बातमी दैनिक टाईम्स ऑफ इडिया या वृत्त पत्रात दि. २६.१०.२०२२ रोजी प्रसिध्द झाली आहे.

उबर कंपनीच्या कंत्राटात व तरतूदीमध्ये विसंगती दिसून येत असल्याचा निष्कर्ष अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवरण मंच, नवी मुंबई यांनी त्यांच्या आदेशामध्ये नोंदविल्याचे दिसून येत नाही.

(३), (४) व (५) समुच्चयक आधारीत प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका (एल) क्र. ९७७५/२०२० मध्ये दिनांक ०७.०३.२०२२ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार राज्यात मोटार वाहन समुच्चयक मार्गदर्शक तत्वे (Motor Vehicles Aggregator Guidelines, २०२०) अनुषंगाने दि.०९.०३.२०२२ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून ॲप आधारीत सेवा देणाऱ्या एकूण १५ समुच्चयकांना (तात्पुरती) अनुज्ञप्ती जारी करण्यात आली आहे.

सदर मार्गदर्शक तत्वांमधील तरतूद क्र. ९(१२-B) अन्वये प्रवाशांसाठी तक्रार निवारण यंत्रणा संबंधित ॲप आधारित कंपनीने कार्यान्वित करण्याचे बंधनकारक असून तशी सुविधा समूच्चयक कंपनींच्या ॲपवर उपलब्ध आहे.

मे.उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि. यांनी मा.उच्च न्यायालयाच्या दि.०७.३.२०२२ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.५७०५ दाखल केली होती. सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ॲग्रीगेटर नियमावली अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महापालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचे सर्वेक्षण करुन लाभ देण्याबाबत

**(३२) ५२६६९ (२७-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी महापालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचे सर्वेक्षण गत काही वर्षापासून झाले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महापालिकेतील दारिद्रय रेषेखालील कुटुबियांचे सर्वेक्षण न झाल्याने शासनाच्या विविध योजनेसाठी पात्र आणि गरजू कुटुंबे या सुविधांपासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचा तात्काळ सर्व्हे करुन योजनेसाठी पात्र आणि गरजू कुटुंबीयांना दारिद्रय रेषेचे लाभ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०४-२०२३) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेतंर्गत दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचे सर्वेक्षण सन २००५ मध्ये झाले असून यामध्ये ७,६८७ इतकी दारिद्रय रेषेखालील कुटूंबियांची संख्या शासनाने निश्चित केलेली आहे.

दिनांक २८.०८.२०१४ अन्वये लागु करण्यात आलेल्या दिनदयाळ अत्योंदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत मार्च, २०१७ पर्यंत सन २००५ मधील निश्चित दारिद्रय रेषेखालील यादी लागु करण्यात आली होती.

दरम्यान शासन निर्णय दिनांक ०२.०८.२०१६ अन्वये आदेशित केल्यानुसार राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियांना अंतर्गत लाभार्थ्यांची परिभाषा बदलण्यात येऊन सामाजिक, आर्थिक व जातीनिहाय सर्वेक्षण सन २०११ नुसार पात्र शहरी गरीब लाभार्थी यांना लाभ देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत सामाजिक, आर्थिक व जातीनिहाय सर्वेक्षण सन २०११ नुसार एकूण ८९,६०० लाभार्थी असून त्यांना दिनदयाळ अत्योंदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत विविध योजनेचा लाभ देण्यात येत असल्याची बाब भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील शहरात वराहांचा प्रचंड वावर वाढल्याने अस्वच्छता पसरल्याबाबत

**(३३) ५२७१३ (१८-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अधिकारी व कर्मचारी यांचे निवास्थान, वसतीगृह व परिसरात वराहांचा वावर वाढत असल्याने सगळीकडे अस्वच्छता पसरली असून त्याचा कर्मचाऱ्यांना प्रचंड प्रमाणत त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वराह काही खाजगी व्यक्तींच्या मालकीची असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्याधिकारी, नगर परीषद, अंबाजोगाई यांना वारंवार बैठका घेऊन वराहांचा बंदोबस्त करण्याबाबत प्रत्यक्ष सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी वारंवार सूचना देऊनही मुख्याधिकारी यांनी संबंधित वराहाच्या मालकांवर कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे शहरातील वराहाचा त्वरित बंदोबस्त करून त्याच्या मालकावर गुन्हे दाखल करण्याबाबत संबंधिताना आदेश देणेबाबची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांचेकडे दिनांक ९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०४-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद; पोलीस निरिक्षक, अंबाजोगाई व अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या उपस्थितीत दि.०४ मे, २०२२ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार, शहराच्या हद्दीतील वराहपालन करणाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. शहराच्या हद्दीत वराह मोकाट फिरतांना आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी समज देण्यात आली.

याशिवाय वराह पालन करणाऱ्या खाजगी व्यक्ती/संस्थांना वराहाचे नियंत्रण/ बंदोबस्त करण्याबाबत वृत्तपत्रातून दि. २६ मे, २०२२ व दि.०७ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहिर सूचना/आवाहन करण्यात आले. तसेच दि.२० सप्टेंबर, २०२२ च्या अंतिम जाहिर सूचनेद्वारे संबंधितांवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंद करण्यात येईल, असेही कळविण्यात आले.

(३) हे खरे आहे.

(४) अंबाजोगाई शहरात वराहांचा पुरेसा बंदोबस्त न झाल्याने दि.११ नोव्हेंबर, २०२२ रोजी शहर पोलीस स्टेशन, अंबाजोगाई येथे एकूण १० वराह पालन करणाऱ्यांविरुद्ध नगरपरिषदेमार्फत रितसर गुन्हा नोंद केला आहे.

---

## चंद्रपूर जिल्ह्याकरिता अल्पसंख्याक कल्याण क्षेत्र विकास निधी मंजूर करण्याबाबत

**(३४) ५३०१७ (१७-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१९-२० या कालावधीत अल्पसंख्याक कल्याण क्षेत्र विकास निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड काळात सदर निधी शासनाने परत घेतल्यामुळे विकास कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविड काळात निधी परत केलेल्या गावांतील प्रलंबित विकासकामे पुर्ण करण्यासाठी पुनःश्च निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये ग्रामिण क्षेत्र विकास योजनेंतर्गत चंद्रपूर जिल्ह्याकरीता अल्पसंख्याक बहुल वस्तीमध्ये विकास कामे मंजूर करून निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मीरा-भाईंदर महापालिकेने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करुन फेरीवाल्यांच्या कागदपत्रांमध्ये डोमिसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असल्याची अट काढून टाकल्याबाबत

**(३५) ५३०५९ (२२-०१-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करुन फेरीवाल्यांच्या कागदपत्रांमध्ये डोमिसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असल्याची अट कांही दिवसांपासून काढून टाकलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोमिसाईल प्रमाणपत्राची अट रद्द केल्यामुळे मीरा-भाईंदर शहरात अधिकृत फेरीवाल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डोमिसाईलची अट काढून टाकल्यानंतर मीरा-भाईंदर शहरातील ७,२२१ फेरीवाल्यांनी ओळखपत्र मिळण्यासाठी महानगरपालिकेडे अर्ज सादर केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी किती फेरीवाल्यांना आतापर्यंत ओळखपत्र देण्यात आले आहे वा सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०४-२०२३) :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये फेरीवाला सर्वेक्षण हे प्रत्यक्ष जागेवर जाऊन ऑनलाईल पध्दतीने करण्यात आलेले आहे.

सदर फेरीवाला सर्वेक्षण पात्रता निश्चित करणेकरिता दि.०९.०१.२०१७ च्या शासन निर्णयानुसार पथविक्रता म्हणून नोंदणी करण्यासाठीच्या पात्रता निकषांमध्ये महाराष्ट्रातील अधिवास प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद आहे.

त्यानुसार डोमिसाईल प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली होती. तथापि, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, यांच्या दि.०७.०२.२०१९ च्या पत्रान्वये, विक्रेता सर्वेक्षण करताना अधिवास प्रमाणपत्राचा आग्रह न धरता, जर ते पथविक्रताकडे उपलब्ध असेल तर घेण्याचे कळविले आहे.
(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत ७२२१ फेरीवाल्यांचे सर्वेक्षण प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. डोमिसाईल प्रमाणपत्राची अट रद्द केल्यामुळे, मिरा-भाईंदर शहरात अधिकृत फेरीवाल्यांची संख्या वाढणार नसल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणेकरिता जानेवारी, २०१९ ला कार्यादेश देण्यात आला होता. सदर सर्वेक्षण जुलै-२०१९ ला पूर्ण झाले असून, ऑनलाईन सर्वेक्षणामार्फत महानगरपालिकेस ७२२१ फेरीवाल्यांची यादी प्राप्त झालेली आहे.
(४) सदर प्रकरणी अद्याप महानगरपालिकेमार्फत फेरीवाऱ्यांना ओळखपत्र देण्यात आलेले नाहीत. फेरीवाला सर्वेक्षण झालेल्या ७२२१ फेरीवाल्यांची यादीस पथविक्रेता समितीची मान्यता प्राप्त झालेनंतर ओळखपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

---

### भुसावळ (जि.जळगाव) नगरपरिषदेच्या नगररचना विभागात बांधकाम प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३६) ५३९२६ (२२-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपरिषदेच्या नगररचना विभागात प्रभारी राजमुळे शहरातील इमारत बांधकामाच्या प्रकरणांना मंजूरी मिळत नसल्याचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या येथे ३० प्रकरणे मंजुरीच्या प्रतिक्षेत असल्यामुळे पालिकेचा महसूल बुडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०२-२०२३) :** (१) नाही,

शासनाने मंजूर केलेल्या एकत्रीकृत प्रोत्साहन नियंत्रण नियमावलीनुसार BPMS या संगणकीय प्रणालीद्वारे दि.०१/०४/२०२१ पासून भुसावळ नगर परिषदेद्वारे ऑनलाईन विकास परवानगी देण्यात येत आहे. भुसावळ नगर परिषदेत नगररचना तांत्रिक प्रवर्गाचे मंजूर पदानुसार मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. हे अधिकारी/ कर्मचारी त्यांचे नियमित कामकाज सांभाळून भुसावळ नगर परिषदेचे कामकाज देखील सक्षमपणे सांभाळत आहेत. सद्यस्थितीत भुसावळ नगर परिषदेच्या नगररचनाकार या पदावर नियमीत नियुक्ती झालेली आहे.

(२) व (३) नाही,

भुसावळ नगर परिषद स्तरावर मंजूरीच्या प्रतिक्षेत असलेल्या सर्व इमारत बांधकामाची प्रकरणे निकाली काढण्यात आली असल्याने भुसावळ नगर परिषदेच्या महसुलावर कोणताही परिणाम झालेला नाही. सबब प्रभारी कार्यभारामुळे इमारत बांधकामाच्या प्रकरणांना मंजूरी मिळत नाही, अशी वस्तूस्थिती दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेकनूर (ता.जि. बीड) येथील ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देणेबाबत

**(३७) ५४२६२ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेकनूर (ता.जि. बीड) हे लोकसंखेने मोठे गाव असून सदरहू ठिकाणी मराठवाड्यात नावाजलेली आठवडी बाजार पेठ असून आजूबाजूच्या ५० गावाचा संपर्क आहे तसेच या ठिकाणी स्त्री रुग्णालय, कुटीर रुग्णालय, राष्ट्रीयकृत बँका, शाळा, महाविद्यालय, शासकीय अध्यापक महाविद्यालय, तसेच विविध शासकीय कार्यालये आहेत. परंतू नेकनूर हे ग्रामपंचायत असल्याने येथे निधीच्या मर्यादेमुळे नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा न मिळाल्याने गावाचा विकास होत नाही. त्यामुळे उक्त ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २६/०८/२०२२ व दिनांक २९/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त ग्रामपंचायतीला नगरपंचायतीचा दर्जा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे,

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदी तपासून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना दि. ०२ सप्टेंबर, २०२२ व दि. २७ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रांन्वये कळविण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रमाणित कागदपत्रांसह अहवाल सादर करण्याबाबत दि.१३.१०.२०२२ व दि.१८.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक संचालक, नगररचना कार्यालय, बीड; तहसीलदार, ता. जि. बीड; गट विकास अधिकारी, ता. जि. बीड; उप अधिक्षक, भूमी अभिलेख, ता. जि. बीड आणि तलाठी, नेकनूर, ता.बीड, जि.बीड यांना सूचित केले आहे. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथील नगरपंचायतीला नगरपालिकेचा दर्जा देण्याबाबत

**(३८) ५४२६३ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) हे तालुक्याचे ठिकाण असून याठिकाणी नगरपंचायत असल्याने केज शहराची वाढ झपाट्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी मोठी व्यापारपेठ असल्याने तसेच नागरिकांना मुलभूत सुविधा मिळण्यासाठी व शहराचा विकास होण्यासाठी सदर नगरपंचायतीला नगरपालिकेचा दर्जा देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २६ ऑगट, २०२२ व २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने, केज नगरपंचायतीचे "क" वर्ग नगरपरिषदेमध्ये रुपांतर करण्यासंदर्भात, अकृषिक रोजगाराच्या टक्केवारीच्या कागदपत्रांसह सुधारीत व सद्यस्थितीदर्शक प्रस्ताव, ठोस समर्थनासह सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना दि. ०१ ऑक्टोबर, २०१९ व २७ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रांन्वये कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.२१ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये तहसीलदार, केज व उप विभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत मुख्याधिकारी, केज नगरपंचायत यांना सूचित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**झाडगाव - पिंपळखुटी - वरूड (ता.राळेगाव जि.यवतमाळ) गावा जवळील नाल्याच्या कामांना निधी मिळण्याबाबत**

**(३९) ५४२९५ (१८-०१-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झाडगाव-पिंपळखुटी-वरूड (ता.राळेगाव जि.यवतमाळ) या गावाजवळील नाला अरूंद झाल्याने माहे जुलै-ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे गावामध्ये पाणी जाऊन अनेक घराची पडझड झाल्याने नाला खोलीकरण व सरळीकरण करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव जलसंधारण विभागाला पाठविण्यात आल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारण विभागामार्फत तीनही गावांच्या नाल्याची पाहणी करून प्रस्ताव तयार केला आहे काय, तसेच प्रस्तावित नाला खोलीकरण व सरळीकरण कामांना कधीपर्यंत निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(३) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, प्रस्ताव तयार करण्यात आला असून खोलीकरण व व सरळीकरण कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, यवतमाळ यांना सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा वितरणाने बसविलेले मीटर सदोष असल्याबाबत**

**(४०) ५४७२१ (२७-०१-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात त्रुटी आढळून आल्याने तसेच सरसकट समान देयक आकारणी करण्यात येत असल्याने हा असमतोल हटविण्यासाठी प्रत्येक जोडणीला मिटर बसविण्याच्या निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु नव्याने बसवलेल्या मिटरचे रिडींग नोदवून जी देयके आकारण्यात आली आहेत ती मोठ्या प्रमाणात सदोष असल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) व (२) ठाणे महापालिकेने सर्व संयोजनांना जलमापके बसविण्याचा निर्णय दिनांक २८.०३.२०१८ रोजी घेतला आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेने व्हॅल्युमेट्रीक पध्दतीने पाणीपट्टीचे दर निश्चित करण्याबाबत दिनांक १७.०६.२०१५ रोजी ठराव केल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, ठाणे महानगरपालिकेने आकारलेली पाणी देयके चुकीची असल्याबाबत नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच काही पाणी देयकात चुका झाल्याची वस्तुस्थिती देखील ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(३) ठाणे महानगरपालिकेने बसविलेल्या मीटरबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आलेल्या मिटर संबंधी असलेल्या पाणी देयकाच्या तक्रारींबाबत तक्रार निवारण कक्ष सुरु करण्यात आला आहे.

या तक्रार निवारण केंद्रामध्ये ग्राहकांच्या पाणी बिलासंबंधी तक्रारीचे निराकरण करण्यात येते. त्यानुसार प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

तसेच ते तक्रार निवारण केंद्र वर्षभर कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत कार्यरत असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भूकंपग्रस्त क वर्गवारीच्या गावातील गडीबाधित व्यक्तींना भूकंपग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करणे बाबत**

**(४१) ५४९५७ (२३-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात सन १९९३ मध्ये झालेल्या भूकंपात क वर्गवारीच्या गावातील मातीच्या गडीवर राहणाऱ्या घरांचे नुकसान झाल्याने सदरील घरांच्या दुरुस्तीसाठी शासनाने रु.३४५००/-अनुदान वाटप केले असून ३० हजार रुपये अनुदान प्राप्त भूकंपग्रस्त कुटुंबातील व्यक्तींना शासनाने शासकीय नौकरीसाठी भूकंपग्रस्त प्रमाणपत्र वितरीत केले असून तांत्रिक वर्गवारी मध्ये गडीबाधित यांचा समावेश चुकल्याने गडीबाधित व्यक्तींना पात्र असतानाही सदरील प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले नाहीत हे खरे आहे काय,
(२) असल्यास गडीबाधित भूकंपग्रस्त लाभार्थ्यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास किल्लारी येथे लातूर जिल्हा प्रशासनामार्फत आयोजित समाधान शिबिरात सदरील प्रमाणपत्र देण्याबाबत लाभार्थ्यांनी मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार सदरील मागणीच्या अनुषंगाने या लाभार्थ्यांना विशेष बाब म्हणून भूकंपग्रस्त प्रमाणपत्र वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) i) उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालय :- हे खरे नाही. शासन निर्णय व शासन तरतुदीनुसार भूकंप पुनर्वसीत क वर्गवारीच्या गावात रु.३४,५००/- अनुदान प्राप्त असणा-या संबंधीत लाभार्थीच्या कुटुंबातील पात्र व्यक्तिस भूकंपग्रस्त प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तहसील कार्यालयाचे स्तरावरून करण्यात येत आहे.

तसेच उस्मानाबाद जिल्ह्यात गडीबाधीत असल्याबाबत लाभार्थी यांनी भूकंपग्रस्त प्रमाणपत्र मिळण्याबाबत मागणी केलेली नाही.

ii) लातूर जिल्हाधिकारी कार्यालय :- होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.
(३) याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून वस्तुस्थिती दर्शक अहवाल व प्रस्ताव मागविण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त अ व ब वर्गवारीच्या गावातील प्रलंबित प्रश्नाबाबत**

**(४२) ५४९६७ (२३-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपात उध्वस्त झालेल्या अ व ब वर्गवारीच्या गावांचे पुनर्वसन शासनाने केले परंतु सदरील पुनर्वसित अ, ब, व क वर्गवारीच्या गावातील घर वाटप आणि इतर मुलभूत प्रश्न प्रलंबित असल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास किल्लारी येथे केंद्रीय सचिव यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या समाधान शिबिरात निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास भूकंपग्रस्त भागातील प्रलंबित प्रश्नाच्या अनुषंगाने व या भूकंपग्रस्त गावातील नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत व त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या समाधान शिबिरात प्राप्त झालेल्या निवेदनांची छाननी करून खालील कार्यवाहीचे मुद्दे ठरविण्यात आले होते. या मुद्यांच्या अंमलबजावणीबाबत झालेल्या प्रगतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. "क" वर्ग गावातील जुन्या गावठाणालगत खाजगी जागेतील अनोंदणीकृत व्यवहार महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमानुकुलन, उन्नतीकरण व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील तरतुदींनुसार नियमित करणे तसेच गायरानातील अतिक्रमणे शासन, ग्राम विकास विभाग, निर्णय क्रमांक प्रआयो-२०२१ /प्र.क्र.८१/योजना-१० दि. २२ ऑगस्ट, २०२२ मधील तरतुदींप्रमाणे नियमित करण्यात येते.

२. भूकंप पुनर्वसित गावठाणात मोकळया भूखंडावर झालेली अतिक्रमणे शासन, ग्रामविकास विभाग, निर्णय क्रमांक प्रआयो-२०१७/ प्र.क्र.३४८/ योजना-१० दि. १६ फेब्रुवारी, २०१८ मधील तरतुदींनुसार नियमानुकूल करण्यात येते.

३. लोकसंख्या वाढीमुळे वाढत्या कुटुंबांना घरे बांधण्यासाठी गावठाणाची मोजणी करून अतिक्रमण विरहीत मोकळया भूखंडातील जागा गावठाण विस्तार योजनेअंतर्गत घरे बांधण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतात.

४. पुनर्वसित गावठाणांच्या जमीनी ग्रामपंचायतीच्या नावे करण्यात येतात.

५. "अ" व "ब" वर्गवारीतील पुनर्वसित गावठाणातील गाव नमुना ८ मध्ये घराच्या आकारमानाबरोबरच मोकळया भूखंडाचे आकारमानाची नोंद घेण्यात आलेली आहे.

६. अतिरीक्त भूखंडांची नोंद गाव नमुना नं. ८ ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीत घेणेबाबत. शासन निर्णय क्रमांक इक्यूआर६९३/ प्र.क्र.७१/ भूपुक दि. ०३ नोव्हेंबर, १९९३ अनुसार ज्या कुटुंबांची सदस्य संख्या १० पेक्षा जास्त आहे व ज्या कुटुंबाचे धारण क्षेत्र १० हेक्टर पेक्षा जास्त आहे अशा कुटुंबांना त्यांना वाटप केलेल्या आकारमानाचाच एक अतिरीक्त भूखंड देण्याची तरतुद आहे. पात्र भूकंपग्रस्त कुटुंबीयांना एक अतिरिक्त भूखंड देण्याची तसेच त्या भूखंडाचा कबाला देण्याची कार्यवाही करण्यात येते.

७. मौजे किल्लारी येथील ८ व ९ व्या फेरीतील घर वाटपाचे यादीस शासन मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि.११.०१.२०२३ अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

८. महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक आरपीए- २०१८/प्र.क्र१५७/र- १/दिनांक १८ मे, २०१८ प्रमाणे भूकंप बाधीतांच्या घरांचे हस्तांतरणावरील निर्बंध पूर्णत: उठविणे बाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि. १७.०१.२०२३ अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

९. शासन, महसूल व वन विभाग, निर्णय क्रमांक आरपीए- २०१८/प्र.क्र१५७/र- १/दिनांक १८ मे, २०१८ प्रमाणे मालकी हक्काने वाटप केलेल्या दुकानांच्या हस्तांतरणावरील निर्बंध पूर्णत: उठविणे बाबत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि. १७.०१.२०२३ अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

१०. मौजे किल्लारी येथे आवाज व्यापारी महिला संघटना यांना हस्तांतरीत केलेले व्यापारी गाळे त्यांच्या सदस्यांना मालकी हक्काने देणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि. १७.०१.२०२३ अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

११. भूकंप बाधीत व्यक्तींसाठी वर्ग ३ व ४ कर्मचा-यांच्या भरतीतील भूकंपग्रस्तांसाठीचे २ टक्के आरक्षण स्वतंत्रपणे लागू करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि. ०५.१२.२०२२ अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

१२. प्रकल्प बाधीत व्यक्ती दाखल्याच्या पात्रता व हस्तांतरणाबाबचे निकष भूकंप बाधीत व्यक्ती दाखल्यास लागू करणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि. ०५.१२.२०२२ अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

१३. मौ.कार्ला व मौ.कुमठा ता.औसा येथील एकुण ७३३ घरांच्या पुनर्बांधणी विषयीचा रू.५२.०७ कोटी अंदाजपत्रीय रकमेचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेकडून दि. ०३.०३.२०२० अन्वये शासनास प्राप्त झाला असुन सदर प्रस्ताव निर्णयाधीन आहे.

लातूर जिल्ह्यातील भूकंप पुनर्वसनातील भूकंपग्रस्तांना घरे बांधून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. भूकंप पुनर्वसनात बांधलेली घरे, शासकीय इमारती, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी खर्चाची तरतूद जिल्हा परिषद लातूर यांनी करणे अपेक्षित आहे.त्यानुषंगाने उपरोक्त बाबतचे प्रस्ताव शासन स्तरावर सादर करू नयेत अशा सुचना जिल्हाधिकारी लातूर यांना दि.२०.०४.२०२१ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेमधील बार्टीचे अधिकारी प्रशिक्षण केंद्राकडून रक्कम वसूल करित असल्याबाबत

**(४३) ५५०२९ (२५-०१-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेमधील बार्टीचे काही अधिकारी मा.मुख्यमंत्री यांचे नाव वापरून प्रशिक्षण केंद्राकडून २१ टक्के दराने रक्कमेची वसूल करत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचोरा-भडगांव (जि.जळगाव) येथील प्रस्तावित साठवण तलावासाठी निधी मिळणेबाबत**

**(४४) ५५०७८ (२२-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव (जि.जळगाव) येथील वडगांव नालबंदी प्रस्तावित साठवण तलावासाठी महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत विशेष बाब मंजूरी देऊन ६ कोटी रुपये निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मुख्यमंत्री महोदय, यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी निवेदनात नमूद कामाबाबत दि. १६.११.२०२२ नुसार महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांना निर्देश दिले आहे. निर्देशानुसार क्षेत्रिय स्तरावर ल.पा.वडगाव नालबंदी या प्रस्तावित करुन योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण पूर्ण करुन आवश्यक पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्रस्ताव व अंदाजपत्रक क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा (जि.लातूर ) येथील जलसंधारण महामंडळ सिमेंट बंधारा बांधकामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४५) ५५३४० (२२-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथील जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांनी सिमेंट बंधारा बांधकामास सन २०२०-२१ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली असून सिमेंट बंधारा बांधकामे आजतागायत सुरू करण्यात आलेली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तसेच सिमेंट बंधारा बांधकाम सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०४-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) औसा विधानसभा मतदार संघातील एकूण २८ गेटेड सिनाबं कामास जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांनी दि. २० जानेवारी, २०२१ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असून कार्यरंभ आदेश देण्यात आले होते. तथापि दि. ०२.०६.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर कामांना स्थगिती देण्यात आली होती. सदर कामांची स्थगिती उठविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील बंद असलेली अग्निशमन केंद्रे सुरु करण्याबाबत**

**(४६) ५५४८८ (२७-०१-२०२३). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात नव्याने उभारण्यात आलेली पाच अग्निशमन केंद्रे दीर्घकाळापासून बंद असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान महानगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अग्निमशन केंद्रे बंद असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू केंद्रे कोणती आहेत व उक्त केंद्रे तातडीने सुरु करुन कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०५-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
दि.२५/०७/२०२२ रोजी कै. महादू सखाराम टिंगरे, धानोरी अग्निशमन क्रेंद्र व कै. दत्तात्रय नवले अग्निशमन केंद्र सुरु करण्यात आली आहेत.
दि.२७/०७/२०२२ रोजी कै.डॉ खंडोजी बोराटे, काळेबोराटे नगर, हडपसर अग्निशमन केंद्र व कै.सतीश धोंडीबा मिसाळ, गंगाधाम अग्निशमन केंद्र सुरु करण्यात आली आहेत.
दि.२९/०७/२०२२ रोजी बी.टी कवडे रोड, घोरपडी अग्निशमन केंद्र व कै. वसंतराव अर्जुन चौधरी, वारजे अग्निशमन केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाद्वारे केलेली विविध विकास कामे, वैयक्तिक व सामुहिक योजनांचा लाभ देताना झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४७) ५५५४२ (२५-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाद्वारे सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीमध्ये केलेली विविध विकास कामे, वैयक्तिक व सामुहिक योजनांचा लाभ देताना झालेल्या गैरप्रकाराबाबतची चौकशी करावी तसेच चौकशी समिती नेमण्यात यावी अशी मागणी केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी सामिती नेमण्यात आली व समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या समितीने माहे ऑगस्ट, २०२२ दरम्यान जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाची चौकशी केली असता आयुक्तांना अहवाल प्राप्त झाला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवाल अद्यापपर्यंत आयुक्तांना न पाठविण्याची कारणे काय आहेत,
(४ असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर अहवाल तात्काळ सादर करून संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
समाज कल्याण आयुक्तालयास तपासणी पथकाचा अहवाल प्राप्त झाला आहे.
(४) होय.
जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे संनियंत्रणाखाली योजना राबवित असल्याने आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांनी दि.१६.०२.२०२३ च्या पत्रान्वये तपासणी पथकाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे नियमानुसार पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर समाजकल्याण विभागातील सहाय्यक आयुक्त यांनी पदभाराचा गैरवापर केल्याबाबत**

**(४८) ५६४७५ (२५-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर समाजकल्याण विभागातील सहाय्यक आयुक्त यांना पदभार मिळाल्यापासून पदाचा गैरवापर केल्याचे

लेखी निवदेन लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ९ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, कोल्हापूर यांची स्वतंत्र चौकशी समिती नेमून तात्काळ अहवाल सादर करण्याबाबत दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी निर्देशित केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चौकशी समिती स्थापन करून संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरिता प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी उत्पनाचा दाखला सक्तीने घेण्याचा निर्णयास स्थगिती देण्याबाबत**

**(४९) ५६४८० (२५-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी माहे जानेवारी ते मार्च या कालावधीत उत्पनाचा दाखला सक्तीने घेण्याचा निर्णयास स्थगिती देण्याची मागणी लोकप्रतिनीधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाचा दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील गरीब व गरजु पात्र लाभार्थ्यांना माहे जुलै ते सप्टेंबर या कालावधीत उत्पन्नाचा दाखला सादर करण्याबाबत निर्देशीत करण्यात आले असून सदरील निर्णय रदद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२३) :** (१) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या उत्पन्नाच्या दाखल्यास स्थगिती देण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या पत्राव्दारे केली आहे.
(२) विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे जुलै ते सप्टेंबर या कालावधीत उत्पन्नाचा दाखला न घेण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि बुलढाणा) येथे नवीन उपप्रादेशीक परिवहन कार्यालयाची निर्मीती करणेबाबत**

**(५०) ५६६४३ (२६-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव, शेगांव, संग्रामपूर, जळगांव जामोद, नांदुरा, मलकापूर या तालुक्यातील सामान्य्र जनतेला वाहन परवाना व परवान्यासंबंधीत कामे असल्यास बुलढाणा येथे किमान ५० ते १०० कि.मी. प्रवास करुन जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहन परवाना व परवान्यासंबंधीत कामे करण्यासाठी सामान्य जनतेला आर्थिक व शारिरीक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुंषगाने खामगांव येथे नवीन उपप्रादेशीक परिवहन कार्यालय निर्मीती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०५-२०२३) :** (१) व (२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत बुलढाणा जिल्ह्यामधील १३ तालुक्यांपैकी १० तालुक्याच्या ठिकाणी शिबीर कार्यालये आयोजित करण्यात येवून अनुज्ञप्ती संबंधित कामकाज केले जाते.

शिबीर कार्यालयातील अनज्ञप्ती संबंधी कामकाज व फेसलेस सुविधेद्वारे होणारे कामकाज वगळता इतर दिवशी वाहनांच्या कामकाजाकरीता उप पादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा येथे यावे लागते.

परिवहन विभागामार्फत नागरीकांना ११५ प्रकारच्या सेवा देण्यात येतात. यापैकी ८४ सेवा ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत.

केंद्र शासनाने दि.१६.०९.२०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ५८ सेवा आधार क्रमांकाचा वापर करुन नागरीकांना फेसलेस पध्दतीने सेवा देण्याबाबत अधिसूचित केलेले आहे. विभागाने जानेवारी २०२३ अखेर २५ सेवा फेसलेस पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
(३) शासनाने दि.१८.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मोटार वाहन विभागांतर्गत नविन प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालये स्थापन करण्याबाबत निकष विहीत केले आहेत. त्यानुसार एखाद्या जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन जिल्हा निर्माण झाल्यास, नवीन जिल्ह्यामध्ये परिवहन कार्यालयाची स्थापना करता येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) कार्यभार,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.